राज्यात सेवा हमी अधिनियम लागू करण्यासाठी गठीत समिती विसर्जित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०१७/प्र. क्र. ७४/१८ (र. व का.)
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण - २०१४ / प्र. क्र. ७४ / १८ (र. व का.), दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४,

२) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

शासन निर्णय :

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन राज्यात सेवा हमी अधिनियम लागू करण्यासाठी विधेयक तयार करण्याच्यादृष्टीने शासनास अहवाल सादर करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये, वरिष्ठ सचिवांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने तयार केलेल्या प्रारुप विधेयकास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ पासून राज्यात लागू झालेला आहे. सदर समिती ज्या प्रयोजनासाठी गठीत करण्यात आली होती ती कार्यवाही पूर्ण झालेली असल्याने शासन निर्णय, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ अन्वये गठीत करण्यात आलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१७११२८१२५८५९१२०७ असा आहे. तसेच डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2017.11.28 13:02:05 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (प्र. सु. र. व का.)

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२१. प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२३. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२४. निवड नस्ती (कार्यासन १८).